# अर्थशास्त्र
## बी.ए. तृतीय वर्ष (सेमिस्टर VI)

- डॉ. प्रज्ञा बागडे

## भारताचा द्विपक्षीय व बहुपक्षीय व्यापार करार
## (Bilateral and Multilateral Trade Agreements of India)

भारत हा आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेचा सभासद झालेला असल्यामुळे जागतिक संबंध मैत्रिचे करुन, जागतिक व्यापार वाढविण्याची जबाबदारीही भारताने घेतली आहे. द्विपक्षीय व्यापार करार म्हणजे दोन देशांमध्ये अल्पकाळाकरिता करण्यात आलेला करार. कार्यकाळ संपल्यानंतर परिस्थितीनुसार दोन्ही देश त्यात आवश्यक ते फेरबदल करतात.

बहुपक्षीय व्यापार करार म्हणजे दोनपेक्षा जास्त देशांमध्ये आयाती व निर्याती व त्यातून निर्माण होणारी देवघेव ह्यांच्यासंबंधात होत असतात. हे प्रामुख्याने दीर्घकाळाकरिता करण्यात येतात.

## द्विपक्षीय व्यापार करार

**(Bilateral  Trade Agreements)**

द्विपक्षीय व्यापार कराराची उद्दिष्ट्ये

काही प्रमुख उद्दिष्ट पूर्तीसाठी दोन देश आपसात व्यापारिक करार करतात.

**१) विदेशी व्यापार वृद्धींगत करण्यासाठी**

बहुपक्षीय व्यापार करार काही विशिष्ट परिस्थितीत कार्यान्वित होत नाही. अशा वेळी विदेशी व्यापाराची वृद्धी व विकास करण्याच्या उद्देशाने द्विपक्षीय व्यापार करण्यात येतात.

**२) एकाधिकार शक्तीचा (हितावह) लाभ प्राप्त करण्यासाठी**

द्विपक्षीय करारामुळे दोन राष्ट्रांचे परस्पर संगनमत होऊन एकाधिकार शक्ती निर्माण होते. म्हणून ह्या एकाधिकार शक्तीने परस्परांना व्यापार व इतरही अनेक लाभ व्हावे या उद्देशाने द्विपक्षीय करार करण्यात येतात.

**३) विनिमय दरात स्थैर्य निर्माण करण्याकरिता**

आंतरराष्ट्रीय व्यापारात सतत वाढ व्हावी व आर्थिक विकास व्हावा ह्या करिता विनिमय दराचा काळ स्थिर असणे आवश्यक आहे. विनिमय दर स्थिर राहावा या उद्देशाने द्विपक्षीय व्यापार करार करण्यात येतात.

**४) जलद गतीने औद्योगिक विकास करण्यासाठी**

जलद औद्योगिककरणाशिवाय कोणत्याही देशाचा विकास होऊ शकत नाही. प्राथमिक उद्योगांपेक्षा द्वितीयक उद्योगांना जास्तीत जास्त महत्व देऊन आर्थिक विकास करण्याच्या उद्देशाने द्विपक्षीय करार करण्यात येतात. ह्या करारामुळे विदेशातून आधुनिक तंत्रज्ञानाची, भांडवलाची, कच्च्या मालाची आयात करुन औद्योगिकरणाचा वेग वाढतो.

**५) देशातील उद्योगांना सरंक्षण देण्यासाठी**

स्वदेशातील उद्योगांना विकसित देशातील मालाच्या स्पर्धेपासून सरंक्षण देण्याच्या उद्देशाने द्विपक्षीय करार करण्यात येतात.

**६) कमी किमतीला आवश्यक वस्तू प्राप्त करण्यासाठी**

द्विपक्षीय कराराद्वारे दोन्ही देश अनुकूल व्यापार अटीद्वारे आवश्यक वस्तू कमी किमतीला मिळवू शकतात. या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी हे करार करण्यात येतात.

**७) विदेशी भांडवलाचा योग्य व काटकसरीने वापर करण्याकरिता**

विदेशी भांडवलाचा दुरुपयोग होत असल्यास त्याचा शोधनशेषावर प्रतिकूल परिणाम होतो. देशाजवळ पुरेसे विदेशी चलन असल्याशिवाय आयात करुन जलद आर्थिक विकास करता येत नाही. विदेशी भांडवलाचा उचित उपयोग होऊन आर्थिक व्यवस्था सुदृढ व्हावी म्हणून हे करार करण्यात येतात.

## द्विपक्षीय व्यापार करारामुळे होणारे लाभ

**(Gains From Bilateral Trade Agreements)**

द्विपक्षीय व्यापार करारामुळे होणारे लाभ पुढीलप्रमाणे

१) देण्याघेण्याच्या आढाव्यात समतोल राखला जावा त्यात असंतुलन निर्माण होऊ नये यासाठी द्विपक्षीय करार प्रयत्नशील व जागरुक असतात.

२) अनावश्यक व विघातक वस्तूंच्या आयातीला या करारामुळे प्रतिबंद घालता येतो. त्यामुळे भांडवलाचा अपव्यय टाळता येतो.

३) या करारामुळे परस्परांमध्ये विश्वास निर्माण होऊन व्यापाराची गती वाढत जाते.

४) दोन देशातील आयात व निर्यात तसेच देवाण घेवाणीमुळे शोधनाची गंभीर समस्या द्विपक्षीय व्यापार करारामुळे निर्माण होत नाही.

५) द्विपक्षीय व्यापार करारामुळे दोन्ही देशांचा लाभ होतो.

६) द्विपक्षीय व्यापार करारात व्यापार निर्बंध लावून स्वदेशातील उद्योगांना विदेशी स्पर्धेपासून सरंक्षण देण्यात येते.

## द्विपक्षीय व्यापार करारावर घेण्यात येणारे आक्षेप (टीका)

### १) अर्धविकसित राष्ट्रांच्या शोषणात वाढ

विकसित राष्ट्रे ही तंत्रज्ञान, भांडवल, यंत्रसामुग्री या सर्वच बाबतीत अर्धविकसित राष्ट्रांपेक्षा संपन्न असतात. त्यामुळे विकसित राष्ट्रे अशा अर्धविकसित देशांचे शोषण करतात.

### २) विकसनशील देशांचा विदेशी व्यापारातील हिस्सा कमी होतो

दोन अल्पविकसित देशांनी आपापसात द्विपक्षीय व्यापार करार करुन लाभ मिळविण्याचा प्रयत्न केल्यास त्यात ते यशस्वी ठरु शकत नाही. कारण अशा या अल्पविकसित देशात भांडवल, आधुनिक तंत्रज्ञान, यंत्रसामुग्री यांची कमतरता असते. या ऐवजी जर विकसित राष्ट्रांनी द्विपक्षीय करार केला तर त्यांचा आंतरराष्ट्रीय व्यापारातील हिस्सा वाढेल. म्हणजेच अल्पविकसित देशांचा हिस्सा कमी होईल.

### ३) बहुपक्षीय व्यापाराची भिती

ज्या देशांना बहुपक्षीय व्यापाराची सवय झालेली असते त्या देशांना बहुपक्षीय व्यापार करतांना अनेक अडचणी येतात. कारण अर्धविकसित देशाजवळ विदेशी चलनाचा पुरेसा साठा नसल्यामुळे ते केवळ आवश्यक असलेल्या वस्तूंचीच आयात करु शकतात. त्यामुळे अर्धविकसित राष्ट्रांना बहुपक्षीय व्यापाराची भिती वाटत असते.

## बहुपक्षीय व्यापार करार

### (Multilateral Trade Agreements)

दोनपेक्षा अधिक देशात लागू करण्यात येणाऱ्या व्यापारिक करारांना बहुपक्षीय व्यापार करार असे म्हणतात. सुरुवातीच्या काळात बहुपक्षीय व्यापार प्रणालीच अस्तीत्वात होती.

त्याच्यानंतर द्विपक्षीय व्यापार प्रणाली सुरु झाली. बहुपक्षीय व्यापारांपासून होणाऱ्या फायद्यामुळे ही प्रणाली जास्त लोकप्रीय झाली.

## बहुपक्षीय व्यापार कराराचे फायदे

१) बहुपक्षीय व्यापार करारामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात उत्पादनाची मात्रा व दर्जा ह्यात जलद गतीने वाढ होते.

२) दोनपेक्षा जास्त देश असल्यामुळे त्यांच्यात स्पर्धा असते त्यामुळे एकाधिकाराला वाव नसतो.

३) बहुपक्षीय व्यापार करारामुळे अनेक देशात आर्थिक सहकार्यात मोठ्या प्रमाणात वाढ होते.

४) बहुपक्षीय व्यापार करारामुळे देशातील उपभोक्त्यांना विदेशातील वस्तू स्वस्तात मिळू शकतात.

५) बहुपक्षीय व्यापार करारात बरेच देश असल्यामुळे विकसित देश अल्पविकसित देशांचे जास्त प्रमाणात शोषण करु शकत नाही.

६) ह्या करारामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात श्रम विभाजन व विशेषीकरण होत असल्यामुळे उपभोक्त्यांना श्रेष्ठ दर्जाच्या वस्तू कमी किमतीत प्राप्त होतात.

७) हे करार दीर्घकाळाकरिता करण्यात येतात.

## बहुपक्षीय व्यापार करार व द्विपक्षीय व्यापार करार यांची तुलना

१) द्विपक्षीय व्यापार करारात अविकसित देशांचे विकसित देशाकडून जेवढे शोषण होते तेवढे बहुपक्षीय व्यापारात होत नाही.

२) द्विपक्षीय व्यापार करारापेक्षा बहुपक्षीय व्यापार करारामुळे विविध देशांना जास्त प्रमाणात सोयी व सवलती मिळतात.

३) द्विपक्षीय व्यापार करारात दोनच देश असल्यामुळे ते एकाधिकारी संघ तयार करुन उपभोक्त्यांचे शोषण करु शकतात. बहुपक्षीय व्यापारात अशी शक्यता फारच कमी असते.

४) द्विपक्षीय व्यापारात कराराच्या बाहेर असणाऱ्या देशांशी पक्षपाती व विभेदात्मक व्यवहार होतो तसा बहुपक्षीय व्यापार करारात होण्याची फारशी शक्यता नसते.

५) बहुपक्षीय व्यापारात विशाल बाजारपेठेच्या उपलब्धतेमुळे उपभोक्त्याला निरनिराळ्या वस्तूंचा उपभोग घेता येतो. द्विपक्षीय करारात संकुचित बाजारपेठ उपलब्ध होते.

६) बहुपक्षीय व्यापारातील संलग्न देश आपल्याजवळील उत्पादन घटकांचा युक्ततम उपयोग करुन तुलनात्मक लाभ मिळवू शकतात. द्विपक्षीय व्यापारात अशा प्रकारचा फायदा मिळत नाही.

## भारत व द्विपक्षीय व्यापार करार

काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते भारत बहुपक्षीय व्यापार करुन त्यापासून लाभ मिळवत असला तरी भारताच्या दृष्टीकोनातून द्विपक्षीय व्यापार करार महत्वपूर्ण मानतात.

दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वीपासूनच द्विपक्षीय व्यापार करार करण्याचे धोरण भारत सरकारने स्विकारले होते. इंग्लंड व्यतिरिक्त जपान व ब्रम्हदेश या राष्ट्रांशी भारताने द्विपक्षीय करार केले होते. या कराराचा उद्देश निरनिराळ्या राष्ट्रांशी प्रत्यक्ष व्यापारी संबंध प्रस्थापित करुन देण्याघेण्याच्या आढाव्यात समतोल राखला जावा हा होता. १९७३ ते १९७५ या काळासाठी भारताने पोलंड बरोबर व्यापारी करार केले होते. १९७३ मध्ये भारत आणि झेकोस्लोव्हाकिया या दोन देशांनी व्यापारी करार केले. १९८०-८१ मध्ये भारताने रुमानिया, झेकोस्लोव्हाकिया आणि पश्चिम जर्मनीशी व्यापार करार केले. १९८१ ते १९८५ या काळासाठी रशिया आणि पोलंड या देशांशी दीर्घकालीन व्यापारी करार करण्यात आले.

प्रो. एजवर्थ म्हणतात, “बहुपक्षीय व्यापार कराराचे अनेक लाभ असूनही द्विपक्षीय व्यापार चालु असल्याचे कारण म्हणजे अ) द्विपक्षीय व्यापारात विकसनशील देशांना आवश्यक आयाती लवकर उपलब्ध होतात. ब) विदेशी स्पर्धेपासून देशी उत्पादनाला सरंक्षण मिळते.” या उलट बहूपक्षीय व्यापारात अनेक अडचणी व समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यामुळेच द्विपक्षीय व्यापार करार अस्तित्वात आहेत व भविष्यातही राहतील.

# अपेक्षित प्रश्न

## दिर्घोत्तरी प्रश्न

१) द्विपक्षीय कराराची उद्दिष्ट्ये, लाभ व तोटे सांगा.

२) द्विपक्षीय करार व बहुपक्षीय करार यांची तुलना करा.

३) बहुपक्षीय व्यापार करार म्हणजे काय? ते सांगून त्याचे फायदे सांगा.

## लघुत्तरी प्रश्न

१) द्विपक्षीय व्यापार करार म्हणजे काय?

२) बहुपक्षीय व्यापार करार म्हणजे काय?

३) द्विपक्षीय व्यापाराचे फायदे व तोटे सांगा.

४) बहुपक्षीय व्यापाराचे फायदे सांगा.

५) भारत व द्विपक्षीय व्यापार करार स्पष्ट करा.